MHRT080001722017

**नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०१७**

**मधील निशाणी १५१ खालील आदेश**

वादीतर्फे मुखत्यार यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.२२ अनिल अनंत शिंदे विरुध्द मुदतीत वारस रेकॉर्डवर न आणलेणे त्यांचे विरुध्द दावा तांत्रिकदृष्टया अबेट झालेला आहे. सदरचा आदेश सेट - असाईड होवून मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केलेला आहे.

२. वादी प्रस्तुत अर्जात असे नमुद करतात की, प्रतिवादी क्र. २२ अनिल अनंत शिंदे यांचा दि. २२/१०/२०२२ रोजी मृत्यू झाला. त्याचा मृत्यु दाखला वेळेत उपलब्ध न झाल्याने त्याचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. यामागे कोणताही गैरहेतु नव्हता. मृत्यूदाखला उपलब्ध झाल्यानंतर हा अर्ज त्वरीत दाखल केला आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा व विलंबाची माफी करण्यात यावी. या अर्जाच्या पुष्टयर्थ नि. १५२ येथे प्रतिवादीने प्रतिज्ञापत्र दिलेले आहे.

३. प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जावर आपले लेखी म्हणणे देवून या अर्जास हरकत घेतलेली आहे. प्रतिवादींच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, वादीने जाणून बुजुन वारस उशिरा रेकॉर्डवर आणले आहेत. अर्जात कोणतेही संयुक्तिक कारण दिलेले नाही तरी अर्ज जास्तीत जास्त खर्चाच्या रक्कमेने मंजूर करण्यात यावा.

४. प्रस्तुत दाव्यातील संपूर्ण अभिलेख, प्रस्तुतचा अर्ज व प्रतिवादीचे म्हणणे याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दावा हा मिळकतीच्या सरस, निरस, तुटक

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.07.14 17:53:04 +0530

वाटपाकरीता दाखल केलेला आहे.

५. एकंदरीत दाव्याचे व वादीने सदर अर्जात केलेल्या मागणीचे स्वरुप बघता, दाव्यामध्ये प्रतिवादी नं. २२ यांच्या विरुध्द झालेला अबेटमेटचा आदेश रद्दबातल होणे गरजेचे आहे. शिवाय झालेला विलंब देखील माफ होण्यास पात्र आहे. सबब प्रतिवादी क्र. २२ यांच्याविरुध्द वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब हा योग्य त्या खर्चाच्या रक्कमेसह मंजूर होण्यास पात्र आहे. सबब पुढील आदेश पारीत करण्यात येतो

**- आदेश -**

१. अर्ज निशाणी १५१ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. २२ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

३. वादीने प्रतिवादी क्र. १ ला खर्चाची रक्कम रुपये २००/- देण्याच्या अटीवर वारस नोंदीसाठी झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2023.07.14 17:53:10 +0530

**(श्रुती ह. पाटील )**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर**
**देवरुख**

**दि. १४/०७/२०२३**

# -: **C E R T I F I C A T E** :-

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No. 17/2017 Exh 151 |
| I affirm that the contents of this pdf file Order are same word as per original Order. | | |
| Name of Jr. Clerk | : | T.N.Khade (Jr. clerk) |
| Court Name | : | Jt. Civil Judge,(J.D.) & J.M.F.C., Deorukh |
| Date of Decision | : | 14/07/2023 |
| Order signed by Presiding Officer on | : | 14/07/2023 |
| Order uploaded on | : | 14/07/2023 |